## विषय : कलाशिक्षण

# इयत्तानिहाय विशिष्ट उद्दिष्टे

## इयत्ता ६ वी ते ८ वी

## कलागट - चित्र-शिल्प

१) कलेच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे.

२) मनातील अव्यक्त कल्पना, भाव-भावना कलाअभिव्यक्तीद्वारे साकार करणे.

३) विद्यार्थ्यांना कलेच्या विविध उपक्रमांतील घटकांची मांडणी करण्याची संधी व स्वातंत्र्य देणे.

४) रंग व रंगसंगती यांची प्राथमिक ओळख करून देणे व चित्रनिर्मितीत त्यांचा योग्य वापर करण्याचे स्वातंत्र्य देणे.

५) विविध कला, कलापरंपरा आणि कलात्मक स्थळे यांचा परिचय करून देणे व चित्र-शिल्प निर्मिती करण्यासाठी प्रेरणा देणे.

६) सांस्कृतिक व कलात्मक वारशाचे संवर्धन करण्याविषयी जाणीव-जागृती निर्माण करणे.

७) सामूहिक कृतिद्वारा जीवनकौशल्ये विकसित करणे.

८) कलानिर्मितीतून 'स्व' निर्मितीचा आनंद घेता येण्याची संधी देणे.

९) चित्र-शिल्प, संगीत, नाट्य इत्यादी कलांच्या एकात्मिक सादरीकरणासाठी प्रवृत्त करणे.

१०) विद्यार्थ्यांना कलानिर्मितीसाठी स्वतंत्र विचार करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

## विषय : कलाशिक्षण

# इयत्तानिहाय विशिष्ट उद्‌दिष्टे

## इयत्ता ६ वी ते ८ वी

## कलागट - संगीत (गायन, वादन, नृत्य)

१) स्वतंत्र सादरीकरणाची क्षमता निर्माण करणे.

२) मनातील भाव-भावनांना प्रकटीकरणाची संधी देणे.

३) नवीन संकल्पनांचे सादरीकरण करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे.

४) भारतीय शास्त्रीय संगीतातील शैलींची ओळख करून देणे.

५) राग परिचय करून देणे.

६) कलांचे एकत्रित सादरीकरण करण्यासाठी प्रवृत्त करणे.

७) समूहगीत, समूहनृत्य, समूहवादन यांच्या सादरीकरणातील कौशल्य वाढविणे.

८) आधुनिक माध्यमे व तंत्रे वापरून आस्वादकता वाढविणे.

### विषय : कलाशिक्षण

## इयत्तानिहाय विशिष्ट उद्दिष्टे

### इयत्ता ६ वी ते ८ वी

### कलागट - नाट्य

१) नाट्याविष्कारातून सहभावना व सांघिकता जोपासण्यास प्रवृत्त करणे.

२) स्थानिक रंगमंचावरील, तसेच दृक्-श्राव्य माध्यमे व आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने कला कार्यक्रमांचा आस्वाद घेण्याची आवड निर्माण करणे.

३) विविध आवाज आणि पार्श्वसंगीताशी संबंधित अभिनयाची संधी उपलब्ध करून देणे.

४) नाट्य, पथनाट्य यांमधून विविध समस्यांविषयी सामाजिक जाणिवा निर्माण करून व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रयत्न करणे.

५) आधुनिक साधन-तंत्रांचा परिचय करून देणे व ती साधन-तंत्रे हाताळण्याची संधी उपलब्ध करून देणे.

६) छोटे-छोटे प्रसंग, कथा यांवर नाट्यलेखन करण्यास प्रवृत्त करणे.

७) नाट्यासाठी पूरक साहित्य कल्पकतेने तयार करण्यासाठी प्रवृत्त करणे.

८) स्वतंत्रपणे विचार करण्याची व आविष्कृत करण्याची संधी उपलब्ध करून देणे.

९) रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्यमांडणी इत्यादी पूरक अंगांचा परिचय करून देऊन प्रत्यक्ष वापराची संधी उपलब्ध करून देणे.

१०) वाचिक, आंगिक अभिनयाद्वारे व्यक्तिमत्त्व विकासाची संधी उपलब्ध करून देणे.

११) नाट्यशास्त्र, नाट्यइतिहास व स्थानिक कलावंत यांचा परिचय व माहिती मिळविण्यास प्रवृत्त करणे.

# पाठ्यक्रम

**कलागट : चित्र-शिल्प** **विषय – कलाशिक्षण** **इयत्ता ६ वी**

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| **चित्र** | **रेखांकन** | • **रेषा**<br>लयदार रेषा,<br>वलयाकृती रेषा.<br>• **आकार**<br>भौमितिक आकार,<br>मानवनिर्मित वस्तूंचे आकार,<br>निसर्गनिर्मित घटकांचे आकार, मानवाकृती. | कागद, पेन्सिल, कंपासपेटी-यांत्रिक साधने, जलरंग, ब्रश, जेलपेन, शाईचा पेन, स्केचपेन, रंगीत पेन्सिली, चारकोल, स्टिक्स्, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • लयदार रेषा, वलयाकृती रेषांची ओळख करून घेतात, रेषा रेखाटनाचा सराव करतात.<br>• निसर्गातील विविध घटक आकारांचे निरीक्षण करतात.<br>• विविध प्रकारचे आकार अचूकपणे ओळखतात.<br>• भौमितिक आकार, निसर्गनिर्मित घटकांचे आकार, मानवनिर्मित वस्तूंचे आकार जाणून घेतात, आकार रेखाटनाचा सराव करतात.<br>• भौमितिक आकार रेखाटनासाठी यांत्रिक साधनांचा उपयोग करतात.<br>• मानवाकृती रेखाटनाचा सराव करतात.<br>• सूचित आकारावर आधारित रेखाटन करतात.<br>• निरनिराळी माध्यमे हाताळून रेखाटनाचा अनुभव घेतात. |
| | **स्मरणचित्र** | कुटुंब, घर, घराचा परिसर शाळा परिसर.<br>• घरातील/मैदानावरील खेळ.<br>• दैनंदिन जीवनातील प्रसंग इत्यादींवर आधारित प्रसंग दृश्य. | कागद पेन्सिल, कंपासपेटी-यांत्रिक साधने, जलरंग, ब्रश, जेलपेन, शाईचा पेन, स्केचपेन रंगीत पेन्सिली, चारकोल स्टिक्स्, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • निसर्गातील निरनिराळे घटक जसे-झाडे, घरे, प्राणी, पक्षी, ढग, मानव इत्यादीचे आकार व रंगाचे निरीक्षण करतात.<br>• परिसरातील कुटुंबातील दैनंदिन प्रसंग/घटना/दृश्य इत्यादींचे निरीक्षण करतात.<br>• छोट्या प्रसंगांवर आधारित रेखाटन, 'स्मरणाने' करतात.<br>• स्मरणचित्रात घटकांची योग्य रचना, मांडणी करतात.<br>• आवडीचे रंग वापरून चित्र रंगवितात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | कल्पनाचित्र | • परिचित कथा, गोष्टीतील काल्पनिक प्रसंग, पाठ्यपुस्तकातील कथा/ कविता व पंचतंत्रातील गोष्टी इ. | कागद, पेन्सिल, रंगीत पेन्सिली, जेलपेन, स्केचपेन, शाईचा पेन, चारकोल स्टिक्स, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, पाठ्यपुस्तकातील कथाकविता, गोष्टींची पुस्तके, कथासंग्रह, परिसरातील उपलब्ध अन्य साहित्य. | • परिचित कथा, पंचतंत्रातील गोष्टी व पाठ्यपुस्तकातील गोष्टी, कविता जाणून घेतात.<br>• स्वत:च्या कल्पना, चित्रात मुक्तपणे मांडून चित्रे काढतात.<br>• रेखाटनात कल्पकतेने रंगांचा वापर करतात.<br>• चित्रातील रेखाटन व रंगकामाच्या नीटनेटकेपणाचे महत्त्व समजून घेतात.<br>• रेखाटलेल्या चित्राबद्दल स्वत:चे मत व्यक्त करतात. |
| | संकल्पचित्र | • चित्रकलेचे मूळ घटक.<br>• विविध प्रकारच्या रेषा.<br>• नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक आकार.<br>• पुनरावृत्ती तत्त्व व आच्छादन पद्धतीचा वापर<br>• प्राथमिक व दुय्यम रंगांची ओळख.<br>• कोलाज/मुद्रातंत्र व पोत यांचा उपयोग | कागद, पेन्सिल, सोनेरी–रुपेरी कागद, अनुरेखन कागद, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, कंपासपेटी–यांत्रिक साधने, जलरंग, ब्रश, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, विविध रंग व पोताचे कागद, खळ, डिंक, भेंडी, कांदा, बटाटा, तसेच ठसे घेता येतील अशा अन्य वस्तू, रंग, शाई किंवा परिसरातील उपलब्ध साहित्य इ. | • चित्रकलेचे मूळ घटक जाणून घेतात.<br>• विविध प्रकारच्या रेषा, नैसर्गिक, भौमितिक, अलंकारिक आकारांची आवडीप्रमाणे रचना करतात.<br>• संकल्पचित्रात पुनरावृत्ती तत्त्व आणि आच्छादन पद्धतीचा वापर करतात.<br>• प्राथमिक व दुय्यम रंग जाणून घेतात व चित्रात त्यांचा उपयोग करतात.<br>• कोलाज, मुद्रातंत्रासाठी उपयोगी साधने–साहित्याचा संग्रह करतात.<br>• कोलाज, मुद्रातंत्र, पोत इत्यादींचा संकल्पचित्रात सौंदर्यनिर्मितीसाठी गरजेनुसार उपयोग करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **वस्तुचित्र - निसर्गचित्र** | • दैनंदिन वापरातील वस्तू<br>• निसर्गनिर्मित घटक (फळे, फळभाज्या, पाने-फुले यांचा सुसंगत समूह)<br>• २ ते ३ वस्तूंची समूहरचना रेखाटन व रंगकाम | दैनंदिन वापरातील वस्तू, प्रवास, बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू, स्नानासाठी उपयुक्त वस्तू, संगणक संच. विज्ञान प्रयोगाचे साहित्य, फळे, फळभाज्या, कागद, पाने, फुले, पेन्सिल, स्केच पेन, शाईचे पेन, जेलपेन, रंगीत पेन्सिली, वॅक्स क्रेयॉन्स, पेस्टल्स, जलरंग, ब्रश | • मानवनिर्मित वस्तू व निसर्गनिर्मित घटक यांचे निरीक्षण करतात.<br>• वस्तू, फळे, फळभाज्या पाने-फुले यांचे आकार व आकारांतील लहानमोठेपणा यांतील फरक समजावून घेतात.<br>• परिचित वस्तूंच्या समूहाचे रेखाटन करतात.<br>• सुयोग्य रंगाने वस्तूंचे रंगकाम करतात. |
| | **अक्षरलेखन** | **अक्षरलेखन**<br>• अक्षरनमुन्यांचा संग्रह, संग्रहित नमुन्यातील अक्षरांप्रमाणे अक्षरलेखन | कागद, पेन्सिल, फलक, रंगीत खडू, शाईचा पेन, जेल पेन, रंगीत पेन्सिली, स्केचपेन, शाई, जाड अक्षरे काढता येतील अशी साधने (उदा. बोरू, जाड स्केचपेन, मार्करपेन, कटनिब्ज्) | • विविध अक्षरांच्या नमुन्यांचा संग्रह करतात.<br>• विविध साधनांनी संग्रहित नमुन्याप्रमाणे अक्षरे रेखाटन करतात व रंगवतात.<br>• विविध नमुन्यातील अक्षर लेखनाचा सराव करतात.<br>• सुंदर, वळणदार अक्षरांचे महत्त्व जाणतात. |
| | **व्यंगचित्र** | • व्यंगचित्रांचा संग्रह.<br>• संग्रहित नमुन्यांमधून कोलाज निर्मिती | वर्तमान पत्रे, मासिके यांतील व्यंगचित्रे, खळ-डिंक, कात्री, कटर, स्केचपेन, रंग साहित्य, ब्रश, जाड कागद. | • व्यंगचित्रांचा संग्रह करतात.<br>• व्यंगचित्रांचे निरीक्षण करतात.<br>• आवडीच्या व्यंगचित्राचे हुबेहूब रेखाटन करण्याचा प्रयत्न करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **कलाइतिहास** | • स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण स्थळाला भेट. (उदा. वास्तू, वेस, चावडी, घाट, नर्सरी, फलोत्पादन केंद्र.)<br>• माहितीचे संकलन इ. | छायाचित्रे, उपलब्ध माहिती पुस्तिका, संदर्भ पुस्तके, चित्रपट्टी, स्लाईड्स, सीडीज, पारदर्शिका, संगणक संच, LCD इ. | • स्थानिक परिसरातील वैशिष्ट्यपूर्ण स्थळांना भेट देऊन माहिती मिळवतात.<br>• वैशिष्ट्यपूर्ण माहितीचे संकलन करतात.<br>• स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण स्थळे, कलावंत, कलापरंपरा, लोककला यासंबंधीची छायाचित्रे, कात्रणे यांचा संग्रह करतात. |
| **शिल्प** | **मातीशिल्प** | • विविध घनाकृती आकार,<br>• अमूर्त शिल्प<br>• शिल्पकृतीचे रंगकाम. | परिसरातील उपलब्ध योग्य माती, रंगीत माती (प्ले-क्ले), कुंभारी माती, शाडू माती, रंग-ब्रश. | • मातकामासाठी योग्य प्रकारे माती तयार करतात.<br>• माती हाताळण्याचे कौशल्य जाणून घेतात.<br>• विविध घनाकृती आकार तयार करतात. आकारातील फरक ओळखतात.<br>• सूचनेनुसार किंवा स्वत:च्या विचाराने अमूर्त आकाराचे शिल्प तयार करतात.<br>• तयार केलेल्या शिल्पकृतींवर रंगकाम करतात. |
| | **कागदशिल्प** | • कागदाचे मुखवटे.<br>• कागद कापणे, घड्या घालणे, चिकटविणे, कागदी कलाकृती निर्मिती व सजावट इत्यादी.<br>• कागदी तुकड्यांपासून (पेपर मॅशे) फळे, भांडी, वस्तू निर्मिती. | घोटीव कागद, सोनेरी-रुपेरी कागद, पतंगी कागद, जुनी मासिके, वृत्तपत्रे, पत्रिकांचे कागद, खाकी कागद, क्रेप पेपर यांसारखे अन्य जाड-पातळ कागद, डिंक-खळ, कात्री,, कटर, स्केल, सजावटीसाठी सहज उपलब्ध होतील असे अन्य साहित्य. | • विविध प्रकारच्या कागदांची ओळख सांगतात.<br>• कागद हाताने किंवा कात्रीने फाडतात. कागदाला घड्या घालतात, कागद चिकटवितात.<br>• कागद फाडणे, घडी घालणे व चिकटविण्याचा अनुभव घेतात.<br>• कागदाच्या सोप्या वस्तू तयार करतात/वस्तूंची सजावट करतात.<br>• कागदी तुकड्यांपासून विविध आकारांची फळे, भांडी तयार करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **अन्य माध्यमाचे शिल्प** | • निकामी/निरुपयोगी वस्तूंच्या उपयोगातून कलात्मक शिल्पनिर्मिती<br>• त्रिमित वस्तूची सजावट. | रिकामी कागदी खोकी, खेळणी, पणती, गाडगे, (बोळके), बिया, धान्य, टरफले, शंख, शिंपले, रंगीत दगड, मणी, लेस, दोरा, टिकल्या, खळ, डिंक इत्यादी. | • परिसरातील निरुपयोगी/निकामी वस्तूंचा संग्रह करतात.<br>• सजावटीसाठी योग्य वस्तूंची निवड करतात.<br>• त्रिमित वस्तूच्या पृष्ठभागावर अन्य निरुपयोगी वस्तू चिकटवून सजावट करतात.<br>• नीटनेटकेपणाचे महत्त्व जाणतात.<br>• वस्तू सजावटीमधून नवनिर्मितीचा आनंद घेतात.<br>• शंख, शिंपले, रंगीत दगड, बिया, धान्ये, टरफले, शेंगा यांसारख्या नैसर्गिक वस्तूंचा संग्रह करतात. |

कलागट : संगीत (गायन–वादन) विषय – कलाशिक्षण इयत्ता ६ वी

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| गायन | **समूहगीत** | • वंदेमातरम्, देशभक्तीपर गीत, निसर्ग गीत, पाठ्यपुस्तकातील कविता | हार्मोनियम, उपलब्ध तालवाद्ये, उपलब्ध माध्यमे, पाठ्यपुस्तके, ध्वनिमुद्रण | • 'वंदेमातरम्' योग्य रीतीने गाऊ लागतात.<br>• देशभक्तीपर, निसर्गगीत, कविता यांतील आशय समजून ताल–सुरात गातात.<br>• देशभक्तीपर गीतातून स्फूर्ती व प्रेरणा मिळवतात व राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व समजून घेतात.<br>• तालासुरात व समूहगायनाने कविता पाठांतराची प्रक्रिया जलद होते.<br>• नैसर्गिक आवाज, ध्वनींशी चांगल्या प्रकारे परिचित होतात.<br>• गायन–वादन, नृत्य या तिन्ही कलांची सांगड घालून कृती व ठेक्यासह सादरीकरण करतात.<br>• समूहगीतातून वैयक्तिक कौशल्य चांगल्याप्रकारे व कमी वेळात आत्मसात करतात. |
| | **स्वरालंकार** | • नवीन दोन स्वरालंकार | हार्मोनियम, शब्दसूचना | • मूळ स्वरांचे नवनवीन रचनाप्रकार समजून घेतात.<br>• स्वरांचे चढउतार समजून घेऊन स्वरालंकार गातात. |
| | **शास्त्रीय संगीत** | 'भूपाली' रागाची सोपी सरगम. बंदिशीचीच सरगम असल्यास चांगले. | हार्मोनियम, सी. डी. कृतिपुस्तिका | • स्वरांच्या आधारे राग समजून घेतात.<br>• सोप्या सरगमच्या माध्यमातून राग ओळखतात व समजून घेतात. |
| वादन | **वादन परिचय** | 'दादरा' तालाचा परिचय | तबला, सी.डी., कॅसेट, इ. पूर्वध्वनिमुद्रण. | • 'दादरा' तालाची माहिती (सम, काल, खंड इ.) समजून घेतात.<br>• 'दादरा' ताल हाताने ठेका देऊन म्हणतात.<br>• तबल्यावर वाजवलेला 'दादरा' ताल ओळखतात.<br>• ऐकवलेल्या गाण्यांतील 'दादरा'ताल ओळखतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **पार्श्वसंगीत** | • ध्वनिमुद्रित धूनद्वारे पार्श्वसंगीताचा परिचय<br>• छोटे-छोटे स्वरसमूह जोडून धून निर्मिती | हार्मोनियम, ध्वनिमुद्रण, उपलब्ध तालवाद्ये, उपलब्ध माध्यमे | • 'पार्श्वसंगीत' ही संकल्पना अधिक विस्तारित स्वरूपात समजून घेतात.<br>• विविध माध्यमे व साहित्याद्वारे पार्श्वसंगीताविषयीचे ज्ञान प्राप्त करून घेतात.<br>• छोट्या स्वरसमूहाची रचना करू लागतात.<br>• पार्श्वसंगीताच्या दृष्टीने छोट्या स्वरसमूहाची धून बनवतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नृत्य | **हालचाली** | • **असंयुक्त हस्तमुद्रा** चंद्रकला, सर्पशीर्ष, मृगशीर्ष, पद्मकोष, भ्रमर, हंसास्य, त्रिशूल, मुकूल<br>• **संयुक्त हस्तमुद्रा** कूर्म, संपुट, पाश, कीलक, डोलहस्त, शिवलिंग<br>• **दृष्टिभेद** सम, आलोकित, साचि, प्रालोकित, निमिलित, उल्लोकित, अनुवृत्त, अवलोकित. | चित्र, हस्तमुद्रांचे चित्र, तक्ते, इंटरनेट, शिक्षक हस्तपुस्तिका | • सूचित केलेल्या हस्तमुद्रांचा अर्थ समजून घेतात.<br>• सुचनेनुसार हस्तमुद्रा सादर करण्याचा सराव करतात.<br>• सादरीकरणातील हस्तमुद्रांचे महत्त्व जाणतात.<br>• हस्तमुद्रांची दैनंदिन व्यवहाराशी सांगड घालतात.<br>• हस्तमुद्रांद्वारे मनातील भावनांची अभिव्यक्ती करतात.<br>• मूक अभिनयासाठी हस्तमुद्रांचा उपयोग करतात.<br>• डोळ्यांच्या विशिष्ट हालचालींच्या प्रकारांचा परिचय करून घेतात.<br>• डोळ्यांच्या हालचालींतून, डोळ्यांना मिळणाऱ्या व्यायामाचे महत्त्व जाणतात.<br>• भाव प्रकटीकरणासाठी असणारे डोळ्यांचे महत्त्व जाणतात व त्यानुसार उपयोग करतात. |
| | **नृत्य परिचय** | • **शास्त्रीय नृत्यशैली परिचय**<br>• कथ्थक, भरतनाट्यम | चित्र, इंटरनेट, दूरदर्शनसंच उपलब्ध दृक्-श्राव्य माध्यमे | • शास्त्रीय नृत्यशैलीची तोंडओळख करून घेतात.<br>• लोकनृत्य व शास्त्रीय नृत्य यांतील फरक समजून घेतात.<br>• कथ्थक, भरतनाट्यम् या शास्त्रीय नृत्यप्रकारांची (प्रांत, वेशभूषा, वाद्ये यांची) माहिती करून घेतात.<br>• नृत्य व चित्र-शिल्पकृतींचा संबंध जोडतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन-साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **रस परिचय** | • **रसांचा परिचय**<br>शृंगाररस,<br>हास्यरस,<br>करुणरस. | पाठ्यपुस्तकातील चित्रे, वृत्तपत्र, मासिकातील चित्रे, दूरदर्शनवरील मालिका दृश्य, गोष्टींची पुस्तके. | • रस म्हणजे काय ते जाणून घेऊन त्यांची तोंडओळख करून घेतात.<br>• सादरीकरणात रसांचे महत्त्व जाणून घेतात.<br>• पाठ्यपुस्तके व गोष्टींच्या पुस्तकांतील चित्रांचा आशय समजून रसांची ओळख सांगतात.<br>• रस आणि दृष्टिभेद यांचा सहसंबंध जोडतात.<br>• शृंगार, हास्य आणि करुण रसांचे चेहऱ्याद्‌वारे प्रकटीकरण करतात. |
| | • **अभिनय गीत** | गोष्टीरूप गीतांवर आधारित अभिनय गीत | चित्र, कार्टून, ध्वनिचित्रफित | • कथेमधील संबंधित व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये, सवयी जाणून घेतात.<br>• रूपकात्मक कथागीतांच्या माध्यमातून मानवी भावनांचा आविष्कार समजू लागतात.<br>• कथेतील निर्माण होणाऱ्या भावनांचा संबंध रसांशी जोडतात.<br>• सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलनात अभिनय गीते सादर करतात. |

## विषय – कला शिक्षण

कलागट : नाट्य

इयत्ता ६ वी

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| नाट्य | **पायाभूत हालचाली** | • संवाद विरहित एकपात्री प्रसंगाचे सादरीकरण.<br>• पार्श्वसंगीताचा वापर | एकपात्री प्रसंग सादरीकरणास योग्य सूचना, पूर्वध्वनिमुद्रण | • दैनंदिन जीवनातील प्रसंगाचे निरीक्षण करतात.<br>• संवादविरहित लहान प्रसंगांचे देहबोलीतून सादरीकरण करतात.<br>• देहबोलीतून व्यक्त होणाऱ्या हालचालींचे महत्त्व जाणून घेतात.<br>• पूर्वध्वनिमुद्रणाचा वापर करून सूचनेनुसार संवादविरहित प्रसंगांचे सादरीकरण करतात.<br>• सादरीकरणातून आनंद घेतात. |
| | **वाचिक अभिनय/ अनुभव कथन** | • पाठ्यपुस्तकातील नाट्य–छटा, नाट्यप्रवेश यांचे साभिनय वाचन.<br>• परिसरातील अनुभवांचे कथन | पाठ्यपुस्तके | • दैनंदिन अनुभव कथन करतात. पाठ्यपुस्तकातील नाट्यछटा व नाट्यप्रवेशांचे भावानुरूप वाचन करतात.<br>• स्पष्ट शब्दोच्चार व आवाजाचे महत्त्व जाणून घेतात.<br>• विरामचिन्हे जाणून घेऊन वाचन करतात. |
| | **सादरीकरण / एकात्मिक सादरीकरण** | • शालेय वातावरणातील प्रसंगांचे गटानुसार सादरीकरण व परीक्षण<br>• चित्र–शिल्प नृत्य–नाट्य, गायन–वादन यांचे एकत्रित सादरीकरण. | उपलब्ध वाद्ये, साधन साहित्य, पूर्वध्वनिमुद्रित गीते, संगीत | • शालेय वातावरणात घडणाऱ्या प्रसंगांचे निरीक्षण करून त्यावर सामूहिक सादरीकरण करतात.<br>• सादरीकरणाचे निरीक्षण करून परीक्षण करतात.<br>• सादरीकरणास टाळ्या वाजवून दाद देतात व चर्चेतून प्रशंसा करतात.<br>• चित्र–शिल्प, गायन–वादन, नृत्य यांच्या एकत्रित सादरी–करणातून आनंद घेतात.<br>• उपलब्ध साधन–साहित्यांचा, वाद्यांचा वापर कल्पकतेने करतात. |

| घटक | उपघटक | उपक्रम/उपक्रम व्याप्ती | साधन–साहित्य | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|
| | **क्लासरूम थिएटर (वर्गनाट्यगृह)** | • फळ्यावर नेपथ्याप्रमाणे चित्रे काढणे. रंगमंच, प्रेक्षागृह, बाजूचे भाग (विंग्ज्) | वर्ग, विद्यार्थी, वर्गातील फळा, उपलब्ध साधन–साहित्य | • नाट्यप्रसंगानुरूप फलकावर रेखाटन करून फलकाचा उपयोग करतात.<br>• वर्गातील रंगमंच व प्रेक्षागृह यांतील फरक जाणून घेतात.<br>• सांघिक कामाचा आनंद घेतात. |
| | **नेपथ्य व तांत्रिक अंगे** | • साहित्यसंकलन व निर्मिती<br>• रंगभूषा, वेशभूषा यांचा वापर | उपलब्ध साधन – साहित्य | • नाटकास आवश्यक साधन–साहित्याचे संकलन करतात.<br>• उपयुक्त साधन–साहित्याची निर्मिती करतात.<br>• रंगभूषा व वेशभूषा अशा पूरक अंगांची माहिती घेतात.<br>• नैसर्गिक व कृत्रिम प्रकाशाचा कल्पकतेने वापर करतात. |
| | **नाट्य इतिहास** | • स्थानिक लोककलावंतांची माहिती–संकलन<br>• नाट्यसंस्थेला भेट | वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके | • वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके इ. मधून उपयुक्त माहिती संकलित करतात.<br>• स्थानिक नाट्यसंस्था, लोककलावंतांची प्रत्यक्ष भेट घेऊन माहिती जाणून घेतात. |